प्रतिष्ठा ठाणे जिल्हावासियांचे हक्काचे दैनिक

# ठाणे टाइम्स

■ ठाणे ■ बुधवार ११ मार्च २०१५ ■ संपादक : श्री. प्रशांत स. कांबळी ■ पाने : ४ ■

## ठाण्यात फोटो सर्कल सोसायटीचे 'विद्युल्लता' प्रदर्शन



ठाणे, दि.१० (प्रतिनिधी) - समाजातील कर्तृत्ववान महिलांची माहिती आपल्याला नेहमीच वाचायला मिळते. समाजाला कळत-नकळत वेगळी दिशा देणाऱ्या त्यांच्या कार्याची माहिती क्वचितच पहायला मिळते. आपल्या कामातून समाजात आगळेवेगळे स्थान निर्माण करणाऱ्या अशा महिलांची कर्तबगारी पाहण्याची संधी फोटो सर्कल सोसायटी या ठाण्यातील छायाचित्रकारांच्या प्रसिद्ध संस्थेतर्फे व विवियाना मॉल यांच्या संयुक्त विद्यमाने 'विद्युल्लता' या छायाचित्र प्रदर्शनातून यंदाही मिळणार आहे. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून हे प्रदर्शन ९ ते ११ मार्च या कालावधीत विवियाना मॉल, ठाणे येथे हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. सकाळी ११ ते रात्री ९ या वेळेत हे प्रदर्शन पाहता येईल. या छायाचित्र प्रदर्शनात पूर्वांचल येथील १४ महिला व महाराष्ट्रातील ४ महिलांचा समावेश आहे. यात पूर्वांचल येथील जेसिमा सुचियाड, एप्रिलदा बारे, तेरेसा खोङथॉ, फोर्सिला डखार, मीरा डखार, कोंग ड्रीम (ड्रीमसिबोन खारकोंगोर), बिरुबाला राभा, जोनाकी बारो, अरुणी हिगिओ, पद्मश्री डॉ. बिन्नी यांगा (माया), आईनी तालोड, ओ इंदिरा ओइनाम, शीलारमणी, डॉ. जामिनी देवी यांचा समावेश आहे. महाराष्ट्रातील सुनिता पाटील, अहिल्या महिला मंडळ (पेण), रजनी परांजपे, प्रिती पाटील यांचा समावेश आहे.